# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/02/2024 (सोमवार) सायंकाळ

---

### जबर दुखापत करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील चांदनी चौक सिल्लेवाडा येथे दिनांक १०/०२/२०२४ चे २०.०० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– छोटु धर्मदास रविदास, रा. सिल्लेवाडा लाल चौक** याने जखमी नामे– आशिष सुर्यवंशी, ३२ वर्ष, रा. सिल्लेवाडा खापरखेडा यांना फोन करून तुझे कंडक्टरीचे पैसे घ्यायला ये. असे बोलुन आपल्या घरा जवळ बोलवुन त्याचे सोबत पैश्याचे देवाण–घेवाण वरून दोघांमध्ये शाब्दीक वाद–विवाद झाला. त्याच कारणामुळे चांदणी चौक येथे आरोपी याने लाकडी दंडयाने फिर्यादी नामे– अंकित दिलीप आमगावकर, वय २९ वर्ष, रा. चनकापुर कॉलनी क्वा. नं. ७६/३ याचा साळा यांच्या उजव्या पायाचे टोगंळयाखाली हड्डीवर मारून गंभीर जखमी केले त्यामुळे त्याचे पायाची हड्डी फॅक्चर झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि आरती नरोटे, ८४२१७१५६९१ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील टोळापार येथे दिनांक ११/०२/२०२४ चे १६.०० वा. ते १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोशन रुपरावजी खांडेकर, वय ३१ वर्षे, रा. बेनोडा ता. वरुड जि. अमरावती याचे वडील मृतक नामे – रुपरावजी गोवींदराव खांडेकर, वय ५५ वर्ष रा. बेनोडा ता. वरुड जि. अमरावती हे मोटर सायकल क्र. एम. एच.– २७/ बी जी– ३५७४ ने ट्रिपल सीट सावरगाव वरुन नरखेडच्या दिशेने आपल्या साईडने येत असता टोळापार गावाजवळ विरुध्द दिशेने येणाऱ्या कार क्र. एम. एच.– २९/ए ई– ६४२६ चा चालक याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जबरदस्त धडक दिल्याने फिर्यादीचे बाबा रुपरावजी गोवींदराव खांडेकर हे जागीच मरण पावले व मोटर सायकलच्या मागे बसलेली महीला व दूसरा व्यक्ती हे गंभीर जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपी कार चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) भादंवि., १८४, १३४ मो.वा.का. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी मपोउपनी गुरूकर मॅडम पोस्टे नरखेड यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी पडवार पोस्टे नरखेड मो. क्र ८७८८१९३४४९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर